मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर २०२३ । पान १

# पुनावळेतील कचरा डेपो अखेर रद्द!

## उद्योगमंत्री उदय सामंत यांची विधानसभेत माहिती

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

महापालिका प्रशासनाच्या मते, 'घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प' आणि नागरिकांच्या मते, 'कचरा डेपो' अशा स्थितीत पुनावळेतील २६ हेक्टरचा राखीव भूखंड चर्चेत आला आहे. २००८ पासून आरक्षित असलेल्या या भूखंडावर 'कचरा डेपो होऊ देणार नाही', अशी भूमिका परिसरातील नागरिकांनी घेतली आहे. त्यासाठी वेळोवेळी त्यांनी आंदोलने केली आहेत. त्याबाबत सोमवारी (ता. १८) आमदार अश्विनी जगताप यांनी विधिमंडळ अधिवेशनात लक्षवेधी मांडली. त्यावर उत्तर देताना उद्योगमंत्री उदय सामंत यांनी, 'पुनावळेत कचरा डेपो होणार नाही, त्यासाठी पर्यायी जागा शोधली जाणार' असे उत्तर दिले. त्यामुळे पुनावळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

मुंबई-बंगळूर महामार्गावरील (देहूरोड-कात्रज बाह्यवळण मार्ग) पुनावळेसह अठरा गावांचा १९९८ मध्ये महापालिकेत समावेश झाला. त्यावेळी विकास आराखडा तयार करण्यात आला. विविध कारणांसाठी भूखंड आरक्षित केले. त्यात पुनावळे येथील २६ हेक्टरचा भूखंड 'घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प' या कारणासाठी आरक्षित केला. मात्र, ही जागा वनविभागाची आहे. त्या बदल्यात त्यांना चंद्रपूर जिल्ह्यातील जागा देण्यात आली असल्याचे महापालिका प्रशासनाने यापूर्वीच स्पष्ट केले आहे. मात्र, गेल्या पंधरा-वीस वर्षात पुनावळे परिसरात नागरी वस्ती वाढली आहे. मोठमोठे गृहप्रकल्प साकारले आहेत. नामांकित शैक्षणिक संस्थांची संकुले आहेत. त्यामुळे कचरा डेपो अर्थात घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाला विरोध होऊ लागला आहे. स्थानिक नागरिकांनी वेळोवेळी वेगवेगळ्या प्रकारे आंदोलन केली आहेत. शिवाय, आमदार अश्विनी जगताप यांनी पुनावळे कचरा डेपो



विरोधात लक्षवेधी सूचना मांडली. ''पुनावळेत गेल्या पंधरा वर्षात विविध शैक्षणिक संस्था, गृहप्रकल्प उभारले. एक लाख नागरिक वास्तव्यास आहेत. कचरा डेपोमुळे मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होऊन पर्यावरण व नागरिकांच्या आरोग्यासाठी प्रकल्प हानीकारक ठरेल. पावसाळ्यात कचरा डेपोतील पाणी पवना नदीत मिसळून रावेत बंधाऱ्याद्वारे घराघरांत जाईल. अशा दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे कचरा डेपो रद्द करावा. तसेच, अटी व शर्तींना अनुसार केंद्र सरकारने कचरा डेपोला मान्यता दिली होती. मात्र, पाच वर्षात अटी-शर्तींची पूर्तता न केल्यास प्रकल्प रद्द झाल्याचे समजले जाते. त्याप्रमाणे पुनावळे प्रकल्प रद्द झाल्याचे स्पष्ट होते. आता पंधरा वर्षांनी महापालिका व वन विभागाने तो मुद्दा पुन्हा खुला केला आहे. मात्र, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यामते, पुनावळे प्रकल्प पुन्हा खुला (रिओपन) झालेला नाही. चुकीची माहिती देऊन दिशाभूल करणाऱ्या व दोषी अधिकाऱ्यांवर सरकार कारवाई करणार का? दोषी अधिकाऱ्यांची चौकशी करून गुन्हे दाखल करणार का? त्या भूखंडावर ऑक्सिजन पार्क उभारणार का? कचरा प्रकल्पासाठी विमानतळ प्राधिकरणाची परवानगी घेतली होती का?,'' असे मुद्दे आमदार अश्विनी जगताप यांनी उपस्थित केले.

> **“** पुनावळे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी एकूण २६ हेक्टर जागा आरक्षित केली होती. त्यातील २२.८ हेक्टर जागा वनखात्याची आहे. त्यांना मुळशी तालुक्यात पर्यायी जागा दिली जाणार होती. ती त्यांना मान्य नव्हती. चंद्रपूरची जागाही वनविभागाला मान्य नाही. शिवाय, पुनावळेत झालेली शाळा-महाविद्यालये, गृहप्रकल्प आणि नागरिकांचा विरोध पाहता, तिथे कचरा प्रकल्प होणार नाही, त्यासाठी पर्यायी जागा शोधली जाईल.
>
> – उदय सामंत, उद्योगमंत्री

### जिथे आरक्षण, तिथेच पर्यायी जागा

**» जयंत पाटील म्हणाले, ''मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्प टप्पा क्रमांक दोनसाठी ३५० कोटी आणि बायोमायनिंगसाठी ४७ कोटी रुपये सरकार देणार आहे. शिवाय, पुनावळेत कचरा डेपो करणे योग्य नाही. ज्या भागातील वनविभागाची जागा प्रकल्पासाठी ताब्यात घेतली जाईल, त्याच भागात पर्यायी जागा देऊन हरित पट्टा उभारावा.'' त्यावर उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, पवना, इंद्रायणी नदी प्रदूषण व कचरा निर्मूलनाच्या दृष्टीने सरकार सकारात्मक आहे. ज्या भागातील जागा ताब्यात घेतली जाईल, त्याच भागात वनखात्याला पर्यायी जागा देण्याचा आदेश सर्व महापालिकांना दिला जाईल.**

# पिंपरी चिंचवड हाफ मॅरेथॉन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## पिंपरी चिंचवड हाफ मॅरेथॉन २०२३ ही स्पर्धा यशस्वीपणे पडली पार

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पिंपळे सौदागर येथील कै.बाळासाहेब कुंजीर क्रीडांगण याठिकाणी रविवार दि.१७ रोजी सकाळी ०५.३० वाजता यशदा रियालिटी ग्रुप एमडी वसंत काटे, नगरसेवक शत्रुघ्न काटे युथ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड हाफ मॅरेथॉन २०२३ ही स्पर्धा यशस्वीपणे पार पडली. सलग तिसऱ्या वर्षी पिंपरी चिंचवड हाफ मॅरेथॉन मध्ये स्पर्धकांचा उत्साह पहायला मिळाला आहे. कै.बाळासाहेब कुंजीर क्रीडांगण पासून कुंजीर चौक, पीके चौक ते कोकणे चौक ते गोविंद यशदा चौक, सुदर्शन चौक, नाशिकफाटा मार्गे ते एमआयडीसी कॉर्नर भोसरी ते पुन्हा फिरून याच मार्गे कै बाळासाहेब कुंजीर क्रीडांगणावर या मॅरेथॉनचा समारोप झाला. पहाटे ५ वाजता गुलाबी थंडीत पिंपरी चिंचवडकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ही मॅरेथॉन स्पर्धा यशस्वी केली.

या स्पर्धेमध्ये ५ किमी, १० किमी आणि २१ किमी या तिन्ही ग्रुप कॅटेगरी मिळून साधारण ३५०० मॅरेथॉनपटूनी सहभाग घेतला होता. लहान मुलांपासून अबाल वृद्धापर्यंत या हाफ मॅरेथॉन स्पर्धेत सहभाग घेत सर्व जण मनसोक्त धावले. यावेळी धावपटूचा उत्साह वाढावा म्हणून जागोजागी ढोल वाजवून त्यांचे स्वागत केले जात होते. स्पर्धेदरम्यान चार ठिकाणी एनर्जी स्टेशन उभे करण्यात आले होते आणि तिथून स्पर्धकांना पिण्यासाठी पाणी, एनर्जी ड्रिंक, मोसंबी, केळी, खजूर आदी पुरविण्यात आले होते. स्पर्धेदरम्यान रुग्णवाहिका तैनात करण्यात आली होती. स्पर्धेसाठी साधारण १०० स्वयंसेवक उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठनेते भाऊसाहेब भोईर, चंद्रकांत अण्णा नखाते, ॲड. राजेश जाधव, विवेक जोशी, सूर्यकांत जाधव, बाबा त्रिभुवन, सुरेश भोईर, मोरेश्वर शेडगे, राजेंद्र गावडे, संदिप गाडे, कैलास कुंजीर, राजाभाऊ मासुळकर, अरुण चाबुकस्वार, कुंदा भिसे, रोहिदास गवारे, गोपाळ माळेकर, शंतनू प्रभुणे, किरण काकुलते, प्रविण कुंजीर, बाळकृष्ण परघळे, दिपक गांगुर्डे, रेडिओ जॉकी आर जे तरुण व इतर मान्यवर उपस्थित होते.

# गुन्हे शाखेने केला आंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश

## ऑनलाईन टास्क, ९५ बनावट बँक खाती, दोनशे कोटींचा व्यवहार




**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
ऑनलाईन रिव्हीव्यू, रेटींग असे वेगवेगळे टास्क देऊन त्याद्वारे नागरिकांना फसवणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा पिंपरी-चिंचवड पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. यामध्ये पोलिसांनी १७ गुन्हे उघडकीस आणत त्याद्वारे तब्बल ९५ खोटी बँक खाते देखील प्रकाशात आणली आहेत. ज्याद्वारे २०० कोटी रुपयांचा फसवणूकीचा व्यवहार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखा युनीट चारच्या पोलिसांनी १४ जणांना अटक केली आहे. हा गुन्हा गंभीर व तांत्रिक स्वरुपाचा असल्याने गुन्हे शाखा युनिट-४ चे अधिकारी (उहळपलहुरव) व अंमलदार यांनी या गुन्ह्यात फिर्यादी यांनी ज्या विविध बँक अकाऊंटमध्ये पैसे ट्रान्सफर केले; त्या बँक अकाउंट बाबत माहिती घेतली. तांत्रिक विश्लेषण करुन यातील आरोपींचा शोध घेतला. एकूण १४ आरोपींची ओळख पटवून त्यांना अटक करण्यात आली आहे. यासाठी दोन पथके तयार करुन रवाना करण्यात आली. या पथकांनी मध्य प्रदेश राज्यातील इंदौर, रतलाम, भोपाळ, राजस्थान राज्यातील जयपुर, उदयपुर, भिलवाडा गुजरात राज्यातील वडोदरा, बिहार राज्यातील पटणा येथून अटक केली आहे. आरोपींनी यामध्ये तीन स्तरीय पद्धतीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले असून यामध्ये पहिल्या स्तरावरील आरोपी हे गरीब गरजू व्यक्ती यांचा शोध घेऊन त्यांच्या नावे वेगवेगळ्या खाजगी बँकेत अकाऊंट व फर्म तयार करत होते. दुसऱ्या स्तरावर आरोपी हे पहिल्या स्तरावर तयार केलेले बँक अकऊंट व किट चेकबुक व इंटरनेट बँकिंग विकत घेत होते. तिसऱ्या स्तरावरील आरोपी हे ऑनलाईन टास्क देऊन त्याचा मोबदला देण्याचे पैशाचे आमिष दाखववून पिडीतांशी व्हॉटसअॅप व टेलिग्राफद्वारे संपर्क साधून त्यांना आमिष दाखवून पिडीतांकडून पहिल्या स्तरावरील अकाऊंट मध्ये पैसे ट्रान्सफर करुन घेत होते. आरोपी हे अतिशय नियोजन पद्धतीने देशभरातील विविध मोठ्या शहरामध्ये जाऊन तेथे नोकरीच्या आमिषाने स्थानिक किवा त्यांच्यासह आणलेल्या व्यक्तीच्या नावाने गाळा भाडयाने घेऊन, शॉपअॅक्ट, उद्यम / एम एस एम ई सर्टीफिकेट ऑनलाईन काढून फर्मच्या नावे वेगवेगळ्या खाजगी बँकांमध्ये करंट अकाउंट उघडत होते. ज्यामुळे संशय येणे देखील कठीण होते.

आरोपींकडून निष्पन्न झालेल्या विविध अकाउंटमधून जवळपास २०० कोटींच्या फसवणुकीचे व्यवहार झाले असून सर्व अकाउंट फ्रिज करुन त्यातील मनी ट्रेलचे विश्लेषण करुन फिर्यादींना पैसे परत मिळवून देण्याची प्रक्रिया सुरू आहे. आरोपींकडून (उहळपलहुरव) आता पर्यत आर्थिक फसवणूक झाल्याचे १७ गुन्हे उघड करण्यात आले आहेत.

ही कारवाई गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर आवताडे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक सिद्धनाथ बाबर, पोलीस उप निरीक्षक गणेश रायकर, पोलीस उप निरीक्षक आबासाहेब किरनाळे, सहायक पोलीस उपनीरक्षक नारायण जाधव, संजय गवारे, दादा पवार, अदिनाथ मिसाळ, पोलीस हवालदार, प्रविण दळे, तुषार शेटे, मोहम्मद गौस नदाफ, रोहिदास आहे, पोलीस नाईक वासुदेव मुंढे, सुनिल गुट्टे, सुरेश जायभाये, पो शिपाई प्रशांत सैद, सुखदेव गावंडे, सायबर सेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैभव शिंगारे, सहायक पोलीस निरीक्षक सागर पानमंद,पोलीस उप निरीक्षक सागर पोमण, पोलीस हवालदार नागेश माळी, पोलीस शिपाई नितेश बिचेवार, पोपट हुलगे यांनी केली आहे.

# टीडीआर घोटाळ्याच्या चौकशीसाठी एसआयटी स्थापन करा

## आम आदमी पार्टीची पत्रकार परिषदेत मागणी

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
महापालिकेतील कोट्यवधी रुपयांच्याकथित हस्तांतरित विकास हक्क (अॅम्युनिटी टीडीआर) घोटाळ्याची एसआयटी चौकशी करण्याची मागणी आम आदमी पार्टीने आज (सोमवारी) पत्रकार परिषदेत केली. आपचे शहराध्यक्ष चेतन बेंद्रे, प्रवक्ते प्रकाश हगवणे हे म्हणाले की,वाकड, भुमकर चौक येथील महापालिकेच्या विकास आराखड्यातील(झउचउ ढृ्ठ) आरक्षण क्रमांक ४/३८ हे ट्रक टर्मिनस व ४/३८ (अ) हे पीएमपीएमएल डेपोसाठी आरक्षित आहे. या आरक्षण प्रकरणी टीडीआरच्या धोरणात्मक बदल का करण्यात आले ? महापालिकेची अनेक ठिकाणी अशाच पध्दतीने समावेशक आरक्षणाखाली म्हणजेच एकोमोडेशन रिझर्वेशन अंतर्गत बांधकामे सुरु आहेत. सर्व प्रकरणांत मोबदला देताना २६ हजार ६२० रुपये प्रति चौरस मीटर दरानुसार देणे बंधनकारक असताना नियमांचा विपर्यास करून या आरक्षणाबाबत ६५ हजार ६९ रुपये प्रति चौरस मीटर दर का काढण्यात आला ? मोबदला देताना शासकिय रेडी



रेडीकनरनुसार बांधकामाचा दर २६ हजार ६२० रुपये प्रति चौरस मीटर असताना तो ६५ हजार ६९ रुपये प्रति चौरस मीटर का दाखवला असा सवालही त्यांनी केला.

शहरातील विविध विषयांवर चार आमदार विधी मंडळात चर्चा करतायेत मग टीडीआर विषयावर गप्प का? आजच्या बाजारमुल्यानुसार जादाच्या टीडीआरची किमंत होते तब्बल १५११ कोटी रुपये त्यामध्ये तब्बल सहा हजार मोहल्ला क्लिनिक तयार झाले असते. तसेच पाच मल्टि स्पेशालिटी हॉस्पिटल तयार झाले असते. आयुक्त तथा प्रशासकांमार्फत लोकांच्या पैशांचे कलेक्शन करण्यासाठीच? स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक पुढे ढकली जात आहे का? आयुक्त शेखर सिंह हे भाजपचे कलेक्शन एजंट आहेत का ? मुंबई महापालिकेच्या धर्तीवर पिंपरी-चिंचवड महापालिकेची कॅग (उअॠ) मार्फत चौकशी करण्यात यावी.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नगरविकास खात्याचे देखील मंत्री आहेत. तर, उपमुख्यमंत्री अजित पवार हे पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री असून देखील हिवाळी अधिवेशनामध्ये एवढ्या मोठ्या घोटाळ्याचे स्पष्टीकरण दिलेले नाही. त्यामुळे त्यांची भूमिका संशयास्पद आहे. लवकरात लवकर त्यांनी हिवाळी अधिवेशन दरम्यान त्याचे स्पष्टीकरण देऊन सनदी अधिकाऱ्यांची (डखढ) टीम बनवून या प्रकरणाची चौकशी करावी. डखढ मार्फत चौकशी होत नाही तोपर्यंत आयुक्त शेखर सिंह तसेच नगररचना व विकास, बांधकाम परवाना, स्थापत्यच्या सर्व अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे. २०१७ सालानंतर महापालिका हद्दीतील सर्व टी. डी. आर प्रकरणांची (डखढ) मार्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# मालमत्ता कराबाबत सरकारचा मोठा निर्णय

## मालमत्ता करासाठी पालिकेत जाण्याची गरज नाही!

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** सदनिका खरेदी केल्यानंतर खरेदीदाराचे नाव 'टॅक्स पेयर' म्हणून आपोआप लागणार आहे. त्याकरिता महापालिकेत जाऊन स्वतंत्र अर्ज करण्याची गरज नाही. ही सुविधा राज्यात मुंबई आणि पनवेल महानगरपालिकांमध्ये सुरू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील तब्बल १४ महानगरपालिकांनी नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाला ही सुविधा सुरू करण्याचा प्रस्ताव पाठविला आहे. त्यानुसार येत्या आठ दिवसांत या महापालिकांच्या हद्दीत ही सुविधा सुरू करण्यात येणार आहे. इज ऑफ डुइंग बिझनेस उपक्रमाअंतर्गत जागतिक बँकेकडून दिल्ली आणि मुंबई ही दोन शहरे निवडण्यात आली होती. त्याअंतर्गत नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून ही सुविधा सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार मुंबईत ही सुविधा सन २०१९ पासून सुरू आहे. पनवेल महापालिकेने नुकतीच ही सुविधा सुरू केली. सध्या मालमत्ता, घर खरेदी केल्यानंतर खरेदी करणाऱ्याला जुन्या मालकाचे नाव वगळून आपले नाव लावण्यासाठी संबंधित महापालिका किंवा नगरपालिकांकडे स्वत: जाऊन (ऑफलाइन) अर्ज करावा लागतो. मालमत्ता खरेदीबाबत नोंदणी झाल्यानंतर त्यांचे ऑटो म्युटेशन होणे आवश्यक आहे. एखाद्या मालमत्तेची खरेदी-विक्री झाल्यानंतर प्रॉपर्टी कार्ड आणि टॅक्स पे रेकॉर्ड यांवर त्याची नोंद होते. या दोन्ही ठिकाणी नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून आता ऑटो म्युटेशनद्वारे माहिती पाठविण्याची सुविधा आहे. म्हणजे प्रॉपर्टी कार्ड अपडेट करण्यासाठी सर्व्हर ते सर्व्हर माहिती पुढे पाठवता येऊ शकते. त्यासाठी विभागाचा सर्व्हर आणि संबंधित महापालिकेचा सर्व्हर यांचे एकत्रीकरण करण्याची सुविधा आहे. त्यामुळे सदनिका खरेदी करणाऱ्यांना महापालिकेत जाऊन स्वत:चे नाव



मिळकतीवर लावण्यासाठी स्वतंत्र अर्ज करायची गरज नाही. खरेदी-विक्री दस्त झाल्यानंतर महापालिकेकडील आणि दस्तातील माहिती १०० टक्के जुळल्यानंतर तातडीने नव्या खरेदीदाराचे नाव करदाता म्हणून लागेल. अन्यथा महापालिकेकडून खरेदीदाराला संपर्क केला जाईल. नोंदणी विभागाकडून खरेदी-विक्रीदाराचे नाव, मालमत्तेचा तपशील आदी अनुषंगिक माहिती स्वयंचलित पद्धतीने पाठविली जाणार आहे. नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, सांगली-मिरज-कुपवाड, मालेगाव, भिवंडी, नगर, मिरा-भाईंदर, वसई-विरार, लातूर, इचलकरंजी, कोल्हापूर आणि अकोला या महापालिकांनी प्रस्ताव दिले आहेत. लवकरच ही सुविधा सुरू होणार आहे, असे नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाचे उपमहानिरीक्षक अभिषेक देशमुख यांनी सांगितले. इज ऑफ डुइंग बिझनेस उपक्रमाअंतर्गत जागतिक बँकेकडून दिल्ली आणि मुंबई ही दोन शहरे निवडण्यात आली होती. त्याअंतर्गत नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून ही सुविधा सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार मुंबईत ही सुविधा सन २०१९ पासून सुरू आहे. पनवेल महापालिकेने नुकतीच ही सुविधा सुरू केली. सध्या मालमत्ता, घर खरेदी केल्यानंतर खरेदी करणाऱ्याला जुन्या मालकाचे नाव वगळून आपले नाव लावण्यासाठी संबंधित महापालिका किंवा नगरपालिकांकडे स्वत: जाऊन अर्ज करावा लागतो. मालमत्ता खरेदीबाबत नोंदणी झाल्यानंतर त्यांचे ऑटो म्युटेशन होणे आवश्यक आहे. एखाद्या मालमत्तेची खरेदी-विक्री झाल्यानंतर प्रॉपर्टी कार्ड आणि टॅक्स पे रेकॉर्ड यांवर त्याची नोंद होते. या दोन्ही ठिकाणी नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून आता ऑटो म्युटेशनद्वारे माहिती पाठविण्याची सुविधा आहे. म्हणजे प्रॉपर्टी कार्ड अपडेट करण्यासाठी सर्व्हर ते सर्व्हर माहिती पुढे पाठवता येऊ शकते. त्यासाठी विभागाचा सर्व्हर आणि संबंधित महापालिकेचा सर्व्हर यांचे एकत्रीकरण करण्याची सुविधा आहे. त्यामुळे सदनिका खरेदी करणाऱ्यांना महापालिकेत जाऊन स्वत:चे नाव मिळकतीवर लावण्यासाठी स्वतंत्र अर्ज करायची गरज नाही.

### लवकरच सुविधा सुरू होणार


**» खरेदी-विक्री दस्त झाल्यानंतर महापालिकेकडील आणि दस्तातील माहिती १०० टक्के जुळल्यानंतर तातडीने नव्या खरेदीदाराचे नाव करदाता म्हणून लागेल. अन्यथा महापालिकेकडून खरेदीदाराला संपर्क केला जाईल. नोंदणी विभागाकडून खरेदी-विक्रीदाराचे नाव, मालमत्तेचा तपशील आदी अनुषंगिक माहिती स्वयंचलित पद्धतीने पाठविली जाणार आहे. नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, सांगली-मिरज-कुपवाड, मालेगाव, भिवंडी, नगर, मिरा-भाईंदर, वसई-विरार, लातूर, इचलकरंजी, कोल्हापूर आणि अकोला या महापालिकांनी प्रस्ताव दिले आहेत. लवकरच ही सुविधा सुरू होणार आहे, असे नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाचे उपमहानिरीक्षक (संगणक) अभिषेक देशमुख यांनी सांगितले.**

# बहुचर्चित गुंड सलीम कुत्ता येरवडा कारागृहात!

## सलीम कुत्ता २०१६ पासून कारागृहातील अंडा सेलमध्ये

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** दाऊद इब्राहिम टोळीतील गुंड महंमद सलीम मीर शेख उर्फ सलीम कुत्ता गेल्या सहा वर्षांपासून येरवडा कारागृहात असून, या कालावधीमध्ये एकदाही त्याची जामिनावर किंवा पॅरोलवर मुक्तता झाली नसल्याची माहिती कारागृह प्रशासनाने सोमवारी दिली. अधिवेशनामध्ये शिवसेना ठाकरे गटाचे नाशिकचे शहराध्यक्ष सुधाकर बडगुजर यांच्या कथित सहभागाची सादर करण्यात आलेली ध्वनिचित्रफीत २०१६ पूर्वीची असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मुंबई बॉम्बस्फोटप्रकरणी सलीम कुत्ता याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. यापूर्वी त्याला नाशिक कारागृहात ठेवण्यात आले होते. त्यावेळी तो दहा दिवस संचित रजेवर (पॅरोल) मुक्त होता. संबंधित ध्वनिचित्रफीत त्यावेळची असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. कुत्ता २०१६ पासून येरवडा मध्यवर्ती कारागृहातील अंडा सेलमध्ये आहे. या काळात




त्याची एकही दिवस कारागृहातून मुक्तता झाली नाही. त्याची मुलगी आणि जावई २०२० मध्ये अधिकृत परवानगी घेऊन त्याला भेटले होते, अशी माहिती कारागृह प्रशासनाकडून देण्यात आली. सलीम हा मूळचा तामीळनाडूमधील तंजावरधील कुट्टा गावाचा रहिवासी आहे. उदरनिर्वाहासाठी तो ९० च्या दशकात मुंबईत आला होता. तेथे तो दाऊद टोळीतील गुंड महंमद डोसा याच्या माध्यमातून दाऊद इब्राहिमच्या संपर्कात आल्या. त्याच्याविरुद्ध पायधुनी, कुलाबा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. मुंबईमध्ये १९९३ मध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोटात त्याचा हात असल्याचे तपासात आढळून आले होते. बॉम्बस्फोट प्रकरणात त्याला न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.

दाऊद इब्राहिम टोळीतील गुंड महंमद सलीम मीर शेख उर्फ सलीम कुत्ता गेल्या सहा वर्षांपासून येरवडा कारागृहात असून, या कालावधीमध्ये एकदाही त्याची जामिनावर किंवा पॅरोलवर मुक्तता झाली नसल्याची माहिती कारागृह प्रशासनाने सोमवारी दिली दाऊद टोळीतील महंमद सलीम मीर शेख उर्फ सलीम कुत्ताची गुन्हेगारी जगतात क्रूर अशी ओळख होती. आक्रमकतेमुळे सलीम कुत्ता असे टोपणनाव पडले. कुत्ता नावामुळे आपली बदनामी होते असा दावा करून 'टाडा' न्यायालयात त्याने नावातून कुत्ता हा शब्द वगळण्याची विनंती केली होती. ती न्यायालयाने मान्य केली होती.

# एएनआयच्या पथकाची पुण्यात धडक कारवाई

## १९ वर्षीय विद्यार्थाला घेतलं ताब्यात, चौकशी सुरु

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मागील काही दिवसांपासून एनआयए पथकाने देशभरात कारवाईचा धडाका लावलाय. आजही देशभरात विविध ठिकाणी एनआयएने छापेमारी केली. एनआयएने आज पुण्यात १९ वर्षीय तरुणाला ताब्यात घेतलेय. मिळालेल्या माहितीनुसार, हा मुलगा पुण्यातील अरिहंत कॉलेजमध्ये शिकत आहे. त्याचे नाव साफवान शेख असे आहे. एएनआयच्या पथकाकडून त्या तरुणाची चौकशी सुरु आहे. त्या तरुणाकडून मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक डिव्हायस जप्त करण्यात आलेय. बंगळुरु येथील इसिस मॉड्यूलच्या टेलिग्राममध्ये हा मुलगा सहभागी होता, त्यामुळे त्याची चौकशी सुरु आहे. आज पुण्यातील गुलटेकडी परिसरात राहणाऱ्या तरुणाकडे चौकशी केलीय. त्याचबरोबर एन.आय.ए.च्या गुन्ह्यात आधीपासून आरोपी




असलेल्याच्या घरी जाऊन देखील चौकश करण्यात आली आहे. च्या बंगळुरु मधील पथकाने आज पुण्यात कारवाई केलीय. पुण्यातील अरिहंत कॉलेजचा विद्यार्थी असलेल्या १९ वर्षीय साफवान शेख याला ताब्यात घेण्यात आलेय. एनआयएकडून चौकशी करण्यात आली आहे. १९ वर्षीय तरुणाकडून मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक डिव्हाइस जप्त करण्यात आले आहेत. एएनआयला मिळालेल्या माहितीनुसार, साफवान हा बंगळुरु येथील इसिस मॉड्यूलच्या टेलिग्राम गृपमध्ये सहभागी होता. त्यामुळे त्याला ताब्यात घेण्यात आले असून चौकशी करण्यात येत आहे. आज अमरावतीमध्येही धडक कारवाई केली. एनआयएच्या पथकाने अचलपूर येथील अकबरी चौकातून २१ वर्षीय तरुणाला आज ताब्यात घेतले. सय्यद सहयाम सय्यद रहेमत असं ताब्यात घेतलेल्या तरुणाचं नाव आहे. एनआयएने ताब्यात घेतलेला तरुण हा अचलपूर येथील महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. अचलपूरमधून ताब्यात घेतलेल्या युवकाची अमरावती येथील जोग क्रीडा संकुल मधील वसंत हॉल याठिकाणी चौकशी सुरू आहे. छखअ टीम नी ताब्यात घेतलेल्या तरुणाच्या घरून काही कागदपत्रे आणि लपटॉप आणल्याची माहिती मिळाली आहे. माहितीनुसार, विद्यार्थी सोशल मीडिया, विशेषत: व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून जिहादी संघटनांच्या संपर्कात होता. हा विद्यार्थी दहशतवादी कारवायांमध्ये सामील असल्याच्या संशयावरून एनआयएचा पथक स्थानिक एटीएस आणि जिल्हा पोलिसांच्या पथकासह आज पहाटे ४ वाजता अचलपूरला पोहोचले होते. मागील काही दिवसांपासून एनआयए पथकाने देशभरात कारवाईचा धडाका लावलाय.

### एनआयएकडून १९ ठिकाणी शोध

» एनआयएकडून आज दक्षिण भारतातील १९ ठिकाणी शोध सुरू आहे. एनआयएने अत्यंत कट्टरतावादी जिहादी दहशतवादी गटाचा पर्दाफाश करून छापे टाकले आहेत. महाराष्ट्रातील अमरावती येथेही छापा टाकण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. एएनआयला मिळालेल्या माहितीनुसार, साफवान हा बंगळुरु येथील इसिस मॉड्यूलच्या टेलिग्राम गृपमध्ये सहभागी होता. त्यामुळे त्याला ताब्यात घेण्यात आले असून चौकशी करण्यात येत आहे. आज अमरावतीमध्येही धडक कारवाई केली.

आजही देशभरात विविध ठिकाणी एनआयएने छापेमारी केली. एनआयएने आज पुण्यात १९ वर्षीय तरुणाला ताब्यात घेतलेय. मिळालेल्या माहितीनुसार, हा मुलगा पुण्यातील अरिहंत कॉलेजमध्ये शिकत आहे. त्याचे नाव साफवान शेख असे आहे. एएनआयच्या पथकाकडून त्या तरुणाची चौकशी सुरु आहे. त्या तरुणाकडून मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक डिव्हायस जप्त करण्यात आलेय. बंगळुरु येथील इसिस मॉड्यूलच्या टेलिग्राममध्ये हा मुलगा सहभागी होता, त्यामुळे त्याची चौकशी सुरु आहे. आज पुण्यातील गुलटेकडी परिसरात राहणाऱ्या तरुणाकडे चौकशी केलीय. त्याचबरोबर एन.आय.ए.च्या गुन्ह्यात आधीपासून आरोपी असलेल्याच्या घरी जाऊन देखील चौकश करण्यात आली आहे. च्या बंगळुरु मधील पथकाने आज पुण्यात कारवाई केलीय. पुण्यातील अरिहंत कॉलेजचा विद्यार्थी असलेल्या १९ वर्षीय साफवान शेख याला ताब्यात घेण्यात आलेय. एनआयएकडून चौकशी करण्यात आली आहे.

# मी अजून म्हातारा झालो नाही: शरद पवार

## लोकांना सरळ करण्याची माझ्यात ताकद

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** तुम्ही माझं काय बघितलंय? मी अजूनही म्हातारा झालेलो नाही. अजूनही लय भारी लोकांना सरळ करु शकतो असं वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केलं. त्यामुळं पवारांचा रोख पक्षात बंडखोरी केलेल्या नेत्यांकडे आहे का? अशा चर्चा सुरु झाल्या आहेत. पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील चऱ्होली खुर्द येथे शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त 'साहेब केसरी' बैलगाडा शर्यतीचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी शरद पवार बोलत होते. शेती संपन्न झाली पण ज्यांच्या हातात देशाची सत्ता आहे. त्यांना बळीराजा बद्दल प्रेम नाही. मोठ्या कष्टानं शेतकऱ्यांनी कांदा पिकवला मात्र, त्याला चांगला दर नाही. चांगला दर मिळत असताना कांद्यावर निर्यातबंदी लावली. शेतकऱ्यांना मदत करण्याऐवजी सरकारनं संकट वाढवण्याच्या गोष्टी केल्याचे शरद पवार म्हणाले. साखर कारखानदारी महाराष्ट्रातील महत्वाची कारखानदारी आहे. साखर निर्यातीवर बंदी घातली. शेतकरी संकटात जाईल कसा याचं काम राज्यकर्ते करत असल्याचे पवार म्हणावे लागेल. आपल्याला पुढच्या काळात एकजूट उभा करावी लागेल. मी तुम्हाला खात्री देतो की, एकजुटीच्या बळावर सबंध महाराष्ट्राचं चित्र बदलल्याशिवाय स्वस्त बसणार नसल्याचे शरद पवार म्हणाले.

पण माझी एक तक्रार आहे. सगळेजण म्हणतात तुम्ही ८३ वर्षांचे झाले ८४ वर्षांचे झाले, पण मी म्हातारा झालो नाही. आणखी लय भारी लोकांना सरळ करण्याची ताकद माझ्यात असल्याचे शरद पवार म्हणाले. पुणे जिल्ह्याच्या हवेली तालुक्यातील 'मी सेवेकरी सोशल फाउंडेशन'चे अध्यक्ष सुधीर विठ्ठल मुंगसे यांनी शरद पवार यांच्वाया ढदिवसानिमित्त केळगांव-चऱ्होली (खुर्द) येथे दिनांक १३ ते १७ डिसेंबर २०२३ दरम्यान 'साहेब केसरी बैलगाडा शर्यतीचे' आयोजन केले होते. या बैलगाडा शर्यतीच्या अंतिम लढती पाहण्यासाठी शरद पवार यांनी हजेरी लावली. यावेळी शिरूरचे खासदार अमोल कोल्हे यांच्यासह माजी आमदार विलास लांडे तसेच शरद पवार गटाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येनं उपस्थित होते. या बैलगाडा शर्यतीच्या निमित्ताने ग्रामीण अर्थव्यवस्थेला संजीवनी देणाऱ्या आणि ग्रामीण संस्कृतीचे भूषण असणाऱ्या स्पर्धा पुन्हा सुरु झाल्याचा विशेष आनंद झाल्याचे शरद पवार म्हणाले.